# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि. २१/०९/२०२२

**प्रेसनोट**

स्वच्छ भारत अभियान नागरी २.० च्या अनुषंगाने दि. १७ सप्टेंबर (सेवा दिवस) ते ०२ ऑक्टोबर २०२२ (गांधी जयंती आणि स्वच्छता दिवस) हा पंधरवडा **"स्वच्छ अमृत महोत्सव"** म्हणून साजरा करणेत येत आहे. या महोत्सवा अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत विविध स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने **सुरुची बिच, वसई गाव** येथे दिनांक **२१ सप्टेंबर २०२२** रोजी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

याअनुषंगाने दिनांक **२१ सप्टेंबर २०२२** रोजी सकाळी वसई किल्ला येथील नरवीर चिमाजी अप्पा यांच्या अश्वरूढ पुतळयाला पुष्पहार अर्पण करून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी जी.जी.कॉलेज वसई ते सुरुची बीच पर्यंत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची स्वच्छता रॅली काढण्यात आली. या स्वच्छता रॅलीमध्ये शालेय विद्यार्थ्यांसोबत विविध सेवाभावी संस्थांचे सदस्य, महिला बचत गट सदस्य, इतर नागरिक व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यानंतर सुरुची बीच येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या मान्यवरांचे महानगरपालिकेतर्फे स्वागत करण्यात येऊन त्यानंतर प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. उपस्थितांमार्फत सुरुची बीच परिसर स्वच्छ करण्यात आला व यामध्ये एकूण ४ टन कचरा संकलित करण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्याबाबत महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या आवाहनाला सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मोहिमेत शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विविध सेवाभावी संस्थांचे सदस्य, महिला बचत गटांचे सदस्य, पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी, विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी तसेच इतर नागरिक व महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व उपस्थितांचे आभार मानले व यापुढेही महानगरपालिकेमार्फत आयोजित होणाऱ्या विविध स्वच्छता उपक्रमांना असाच उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन केले.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**